## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ५ (प्रतिनिधी) नवउद्योजक होवू इच्छिणा-यांनी यशस्वी उद्योजक होण्यासाठी प्रामाणिकपणा, वचनबध्दता या गुणांसोबतच आपल्या उत्पादनाची गुणवत्ता उत्तम ठेवावी असे आवाहन पिपल्स को-ऑपरेटिव्ह बॅंकेचे अध्यक्ष श्री. भालचंद्र पाटील यांनी विद्यापीठात आयोजित नवउद्योजक कार्यशाळेत केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील इनोव्हेशन इन्क्युबेशन अँड लिंकेजेस केंद्राच्यावतीने २२ नवीन उद्योजकीय कल्पना निवडण्यात आल्या असून या स्टार्टअॅप सुरू करणा-या ३२ नवउद्योजकांसाठी तीन दिवशीय कार्यशाळा दि. ५ ते ७ जुलै दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत प्रमुख पाहूणे म्हणून मार्गदर्शन करतांना श्री. भालचंद्र पाटील बोलत होते. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी होते. एसके फॉर्म्यूलेशनचे संचालक सचिन जोशी यांची ही यावेळी उपस्थिती होती. श्री. भालचंद्र पाटील यांनी आपल्या जीवनाचा संपुर्ण प्रवास या कार्यशाळेत मांडला. प्रामाणिकपणामुळे यश प्राप्त झाले हाच प्रामाणिकपणा नवउद्योजकांनी कायम ठेवावा. अडचणी आल्या तरी यातून मार्ग निघत असतो. स्वत:वर विश्वास ठेवा. संघर्ष हा शब्द काढून टाका अशा काही टिप्स त्यांनी दिल्या. श्री. सचिन जोशी यांनी आपल्या भाषणात इतरांचा सल्ला घेण्यापेक्षा स्वत:च्या ज्ञानाचा वापर करून स्वत:ला जे वाटते ते करा. उद्योगात यशस्वी होण्यासाठी वेळेचा सन्मान करा. केवळ पैसा हे एकमेव उद्देश डोळयासमोर ठेवू नका असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी ज्ञान व माहिती, आनंद व खात्री आणि नाते व कनेक्शन याबाबत तरूण पीढी संभ्रमित आहे असे सांगून हा फरक समजून घ्यावा व त्यातून परिस्थितीशी लढण्याची तयारी ठेवावी. नवउद्योजक होत असतांना कल्पना, ज्ञान आणि सृजनशीलता याचे पैश्यात रूपातर करा. त्यातून रोजगार निर्माण करणारे व्हा असा सल्ला प्रा. माहेश्वरी यांनी दिला. प्रारंभी संचालक डॉ. राजेश जवळेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विकास गीते यांनी इनोव्हेशन इन्क्युबेशन अँड लिंकेजेस केंद्राची माहिती दिली तर समन्वयक डॉ. भूषण चौधरी यांनी तीन दिवशाच्या या कार्यशाळेत नवउद्योजकांना कोणत्या प्रकारचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे याची माहिती दिली. सागर पाटील यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले.

## बातमी नं. २

जळगाव, दि.५ (प्रतिनिधी)- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेत 'डिप्लोमा इन जर्नालिझम' आणि 'एम.ए.एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता)' या कौशल्यआधारित व रोजगारभिमुख पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. ऑनलाईन प्रवेशाची अंतिम मुदत दि. 31 जुलै 2023 आहे.'डिप्लोमा इन जर्नालिझम' हा बारावी नंतरचा एक वर्षीय अभ्यासक्रम असून प्रवेश घेण्यासाठी इयत्ता बारावीत किमान 40 टक्क्यांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच पदवी (ग्रॅज्युएशन) नंतर 'एम.ए.एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता)' हा दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे. हे दोन्ही अभ्यासक्रम पूर्णत: रोजगारभिमुख असून यशस्वी विद्यार्थ्यांना वृत्तपत्रे, रेडिओ, वृत्तवाहिन्या, ऑनलाईन पत्रकारिता, सोशल मिडिया, जाहिरात संस्था आदी ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहे. त्याचबरोबर शासकीय किंवा खाजगी क्षेत्रात जनसंपर्क अधिकारी, संवाद तज्ज्ञ, सोशल मिडिया हॅंडलर म्हणून कार्य करण्याची देखील संधी उपलब्ध आहे.

प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट देवून https://nmujoa.digitaluniversity.ac या ऑनलाईन ॲडमिशन लिंकला क्लिक करून प्रवेशासंबंधी अर्ज करणे आवश्यक आहे. तरी इच्छूक विद्यार्थ्यांनी 'डिप्लोमा इन जर्नालिझम' आणि 'एम.ए.एम.सी.जे.' प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर (8407922404), डॉ.गोपी सोरडे (9834166072) अथवा प्रशाळेत कार्यालयीन वेळेत 0257-2257436, 2257438 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर यांनी केले आहे.

...२

## जनसंपर्क विभाग



## बातमी नं. ३

जळगाव, दि.५ (प्रतिनिधी)- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागातील विद्यार्थी **चरणदास मदन पवार** व **पूजा गोकुळ देवरे** यांनी मार्च २०२३ मध्ये झालेल्या सेट परीक्षेत संरक्षण आणि सामरिक शास्त्र या विषयात यश संपादन केले आहे.

आतापर्यंत विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागातील एकूण ११ विद्यार्थ्यांनी सेट व नेट परीक्षेत यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक डॉ.रामचंद्र भावसार यांनी कौतुक केले आहे. संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागातील सहा. प्रध्यापाक डॉ. तुषार रायसिंग व डॉ. सुभान जाधव यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ५ जुलै, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी